

स्त्रीवादी साहित्याचा उदय पुरुषप्रधान संस्कृतीच्या कडेलोटातून झाला आहे. त्यामुळे तो मराठी माणसाला आणि मराठी साहित्याला टाळता येणार नाही. उलट स्त्री जाणीव आता मानवकल्याणाकडे झेपावते आहे. आपल्या आग्रही भूमिकेतून सृजन, पोषण, संवर्धन, परस्पर सहकार्य यांचा एक वेगळा दृष्टिकोन मांडते आहे. जर त्याचा अंगिकार आपल्या समाजाने केला तर निश्चितच बदल घडून येईल. कारण हिंसा, द्वेष, आक्रमकता, संकुचित स्वार्थ ह्या विनाशकारी वृत्तीशी स्त्री-शक्ती लढा देते आहे. त्यामुळेच अशावेळी खेड्यापाड्यातील स्त्रियांचे आतून आलेले हुंकार ऐकणे, समजून घेणे आवश्यक आहे. खेड्यापाड्यातून शेतकरी आत्महत्या वाढल्या आहेत, आणि त्यांच्या विधवा स्त्रिया नव्याने संघर्ष करीत लढत आहेत. आपले जगणे सावरण्यासाठी, सुधारण्यासाठी, परिस्थितीशी दोन हात करीत आहेत. रूढी व परंपरेच्या गुलामगिरीतून मुक्त होऊ पाहत आहेत. खचून न जाता कुटुंब व समाजाने लादलेल्या क्लेशदायक अनिष्ट सांस्कृतिक बेड्या तोडू पाहत आहेत. अशा स्त्रियांचा शोध घेऊन त्यांच्या जीवनगाथा समाजापुढे आणण्याचे नवे आव्हान स्त्रीवादी साहित्यापुढे आहे. डॉ. मारोती कोल्हे यांनी स्त्रीवादी कवितेवरील केलेल्या संपादनाने या नव्या साहित्य प्रवाहास पुष्टी प्रदान केली आहे. हे स्तुत्य आहे.

प्राचार्या डॉ. प्रतिमा इंगोले
दर्यापूर जि. अमरावती

समीक्षा ₹ 125
ISBN 978-93-88113-86-1
9 789388 113861
Prashant
www.prashantpublications.com
prashantpublication.jal@gmail.com



# स्त्रीवादी कविता
## आस्वाद आणि समीक्षा

Prashant

संपादक : डॉ. मारोती कोल्हे

# अनुक्रमणिका


१. स्त्रीवादी समीक्षा
- प्रा. डॉ. संगीता घुगे ........ २१

२. 'तहहयात' स्त्रीवादी कवितेचा सशक्त आवाज
- डॉ. मधु सावंत ........ २७

३. स्त्री अस्तित्त्वाचे शिल्प कोरणारी कविता:अस्तित्त्वाचा अजिंठा कोरताना
- डॉ. संतोष हंकारे ........ ३५

४. भारतीय स्त्रीवादाचे तत्त्वज्ञान सांगणारी विद्रोही कविता:शिर:स्नाता
- डॉ. मारोती कसाब ........ ४३

५. स्त्री भावनेचा हुंकार
- डॉ. मारोती कोल्हे ........ ५१

६. 'वाताहतीची कैफियत' मधील स्त्रीवादी भूमिकेचे वेगळेपण
- डॉ. शत्रुघ्न जाधव ........ ५७

७. नीरजा यांच्या काळातील स्त्रीवादी जाणीव
- डॉ. शिवसांब कापसे ........ ६२

८. स्त्रीवादी साहित्य स्वरुप व आस्वाद
- प्रा. डॉ. ज्ञानदेव राऊत ........ ६६

९. स्त्रीवादी कवितेच्या पाऊलखुणा
- डॉ. संगीता पैकेकरी ........ ७२




Scanned with CamScanner

## ९. स्त्रीवादी कवितेच्या पाऊलखुणा

डॉ. संगीता पांडुरंग पैकेकरी

स्त्रीवाद ही संकल्पना पाश्चात्य देशामध्ये जरी उदयाला आली. तरी भारतीय साहित्यात तिच्या पाऊलखुणा पाहण्यास मिळतात. स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला स्वतःला आपण पुरुषांप्रमाणे माणूस असल्याची जाणीव होणे किंवा स्त्री म्हणून जाणीव जागृत होणे. ही स्त्री जाणीव अगदी लोकसाहित्यातूनही दिसून येते

"राम म्हणून राम नाही
सीतेच्या तोलाचा
हिरकणी सीतामाई
राम हालक्या दिलाचा
किंवा
सीतेला ग बनवास
सासू कैकईने केला
रामासारखा ओ जोडा
भोगू नाही दिला."

पूर्वी स्त्रिया आपले दुःख सांगण्यासाठी जात्यावरील ओवीचा वापर करीत होत्या. त्यांना खूप कष्ट करावे लागत होते. स्त्री ही दुय्यमतेनेच जगत होती. पण तेव्हाही काही स्त्रियांनी आपल्या ओवीतून स्त्री प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. ही कविता स्त्रीवादी होऊ शकते. रामायणातील राम हा देव व कैकई ही रामाची (सावत्र) आईच पण आपल्याकडील स्त्रीने जात्यावरील ओवीत रामाला व कैकईलाच कमी लेखले आहे.

संत कवयित्रींनेही स्त्री जाणीवेतून अभंग लिहिल्या चे दिसून येते.

"डोईचा पदर आला खांद्यावरी । भरल्या बाजारी जाईन मी ॥



हाती घेईन टाळ खांद्यावरी वीणा । आता मज मना कोण करील ॥
पंढरीच्या पेठे मांडियले पाल । मनगटावर तेल घाला तुम्ही ॥
जनी म्हणे देवा मी जाले येसवा । निघाले केशवा घर तुझे ॥"

हा अभंगही स्त्री जाणीवेतूनच लिहिला आहे. ज्या काळात स्त्रीला बोलण्याचही स्वातंत्र्य नव्हतं त्या काळात काही स्त्रियांनी स्त्री जाणीवेतून लेखन केले आहे.

शिक्षणाचा गंध ही नसणाऱ्या बहिणाबाईनी आपल्या गीतातून स्त्री प्रश्न तर मांडलाच मांडला पण जीवनाचे तत्त्वज्ञानही मांडले आहे.

"अरे संसार संसार
जसा तवा चुल्यावर
आधि हाताला चटके
तव्हा मियते भाकर"

किंवा त्यांनी माणसालाच प्रश्न विचारला आहे.

"अरे माणसा माणसा
कधी व्हशील माणूस
लोभासाठी झाला
माणसाचा काणूस"

बहिणाबाई म्हणतात ते बरोबर आहे. पुरुष प्रधान संस्कृतीचा लोभ चढला व माणूस माणसाचा काणूस झाला. स्त्रीकडे एक माणूस म्हणून ही पाहिले जात नाही. तिच्या असल्याने किंवा नसल्याने समाजाला, नवऱ्याला फरक पडत नाही. तिचा जन्म हा मुले जन्माला घालण्यासाठीच असतो अशी एक धारणा आहे.

आजची स्त्री शिक्षणाने जागृत झालेली आहे. तिला तिच्या अस्तित्वाची जाणीव झाली आहे. ती आजपर्यंत कठपुतळी सारखी जगत आली आहे. तिला तिचे आयुष्य जगताच आले नाही. कधी आई-वडील, भावासाठी जगत आली तर कधी मुलाबाळासाठी, नवऱ्यासाठी जगत आली आहे. यां संदर्भात पद्मा गोळे लिहितात-

"आता सोंग पुरे झाले
सारी ओझी जड झाली
उतरुन ठेऊनी आतातरी
माझी मला शोधू दे
तुकडे तुकडे जमवू दे
विशाल काही पुजू दे"

आजची स्त्री 'स्व' मुक्तीचा विचार करुन स्वतःसाठी जगण्याचा प्रयत्न करीत आहे. पण एक पाय घरात एक पाय बाहेर अशी तिची अवस्था आहे. इंदिरा संतांनी मध्यमवर्गीय



Scanned with CamScanner